International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# भारतीय साहित्य आणि प्रसार माध्यमे

**Chaitali Koshti**

भारत देशाची भौगोलिक राष्ट्रीय सामाजिक आणि सांस्कृतिक संकल्पना स्पष्ट झाल्यावर एक प्रश्न मनात उठणे अगदी स्वाभाविक आहे तो म्हणजे भारतीय साहित्य काय असेल वास्तविक साहित्य या शब्दाचा अर्थ सामग्री असा आहे स्वयंपाकाचे साहित्य परीक्षेचे साहित्य शेतीचे साहित्य असे शब्दप्रयोग आपण नेहमीच करत असतो पण नुसता साहित्य हा शब्द मात्र एकच एका विशिष्ट अर्थ सांगतो तो म्हणजे लेखन हा होय या लेखनाच्या संदर्भातही साहित्यही सज्ञा मोठी सर्वसमावेशक आहे वांग्मय अशी आणखी एक संज्ञा साहित्याला पर्यायी सज्ञा म्हणून वापरली जाते.

जे जे वाणीमय तेथे वाङ्मय , जे जे लिखित तेथे साहित्य

अशा अर्थाची व्यापकता दोनही संबोधात दिसते मराठी भाषेतील साहित्य ही संकल्पना इंग्रजीतील लिटरेचर या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून उपयोजित केली आहे साहित्य हा शब्द सहित या धातूपासून निर्माण झालेला असून सहित म्हणजे एकत्र ठेवलेले असा आहे विचार आणि भावना यांचा भाषेच्या सहाय्याने साधलेला कल्पनात्मक स्वरूपाचा संग्रह म्हणजे साहित्य . भारत हे जगातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र आहे. या देशाचे आकारमान उपखंडसदृश आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, रूढी, परंपरा, लिपी, संस्कृती, प्रांत यांमुळे हा देश बहुवंशीय-बहुसांस्कृतिक राहिला आहे.. भारतीय राज्यघटनेनुसार इथे भाषावर प्रांतरचनेने अस्तित्वात असलेली २९ राज्ये असून, सात केंद्रशासित प्रदेश आहेत. घटनेच्या आठव्या परिशिष्टानुसार २२ भाषांना राजभाषेचा दर्जा देण्यात आला असून, दुय्यम वा प्रदेशमान्य प्रशासकीय भाषांचा विचार करता, ही संख्या ३१ च्या घरात जाते. आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, छत्तीसगड, गोवा, गुजरात, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, झारखंड, कर्नाटक, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, ओडिशा, पंजाब, राजस्थान, सिक्कीम, तमिळनाडू, तेलंगणा, त्रिपुरा, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पश्चिम बंगाल अशी ती २९ राज्ये होत. केंद्रशासित प्रदेशात अंदमान व निकोबारद्वीप, चंडीगड, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव, लक्षद्वीप, दिल्ली, पुद्दुचेरी यांचा समावेश होतो. आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोंकणी, मैथिली, मल्ल्याळम्, मणिपुरी, मराठी, नेपाळी, उडिया, पंजाबी, संस्कृत, संथाली, सिंधी, तमिळ, तेलुगू, उर्दू या मान्य राजभाषा होत. या भाषांच्या लिप्याही घटनामान्य असून, आसामी, बंगाली, देवनागरी, गुजराती, कन्नड, परशिया, मल्ल्याळम्, उडिया, गुरुमुखी, तमिळ, तेलुगू या त्या ११ लिप्या होत.

साहित्य म्हणजे शब्द आणि अर्थाचा मेळ. तो रसात्मक वाक्यातून घातला गेल्याने साहित्य ललित बनते. साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंब. साहित्यकार ते आपल्या निरीक्षणातून उतरवतात. साहित्यलेखनाचे माध्यम म्हणून भाषा आणि लिपीस असाधारण महत्त्व असते. आपले पहिले साहित्य मौखिक होते म्हणून वाङ्मय नावाने ते ओळखले जायचे. लोकसाहित्य तसेच; पण नंतर लिखिताची परंपरा सुरू झाली. मग साहित्याचे अनेक प्रकार अस्तित्वात आले. आरंभी मनुष्य काव्य लिहायचा. विस्ताराच्या गरजेतून गद्यशैलीचा उदय झाला. आज गद्य आणि पद्य दोन्ही अनेक अंगांनी आणि प्रकारांनी सादर होतं. कविता, गीत, गझल, अभंग, गवळण, सुनीत, खंडकाव्य, महाकाव्य अशा अनेक प्रकारे काव्य लिहिले जाते. गद्य साहित्याचेसुद्धा अनेक प्रकार आहेत. कथा, कादंबरी, नाटक, निबंध, चरित्र, आत्मकथन, आठवणी, प्रवासवर्णन, पत्र, वृत्तांत, श्रुतिका इ.भारतीय साहित्याचा प्रारंभ संस्कृतपासून होतो. ऋग्वेद प्राचीन ग्रंथ मानला जातो. ब्राह्मण, आरण्यक, उपनिषद अशा रूपाने या साहित्याचा विकास होत गेला. मग वैदिक आणि लौकिक साहित्य अवतरले. त्यात मग रामायण, महाभारत, पुराणांचा अंतर्भाव झाला. पंचतंत्र, हितोपदेश हेदेखील प्राचीन साहित्यच. संस्कृत भाषेनंतर पाली, प्राकृत, अपभ्रंश भाषांमध्ये साहित्य रचले जाऊ

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

लागले. उत्तरेतील भाषा आर्य मानल्या गेल्या, तर दक्षिणेतील द्रविड. आर्य भाषांतून सिंधी, पंजाबी, राजस्थानी, गुजराती, हिंदी, मराठी, उडिया, बंगाली इ. भाषा उदयाला आल्या. तमिळ, कन्नड, मल्ल्याळम्, तेलुगू द्रविडी भाषा होत. या सर्व भाषांच्या साहित्याचा इतिहास गेल्या १००० वर्षांत घडला. संस्कृतची परंपरा मात्र प्राचीन होय. या सर्वांचे समग्र स्थान म्हणजे भारतीय साहित्य होय. मॉरिस विंटरनित्स, अलब्रेख्तवेबर फेजर प्रभृती इंग्रज, फ्रेंच, जर्मन इतिहासकारांनी भारतीय भाषा नि साहित्याचा इतिहास लिहून ठेवला आहे. 'इम्पीरिअल गॅझेटिअर ऑफ इंडिया' (१९०८), 'व्हर्नाक्युलर लिटरेचर', 'पॉप्युलर लिटरेचर ऑफ नॉदर्न इंडिया'सारख्या ग्रंथांतून आपणास भारतीय साहित्याची ओळख होते. पुढे भाषागणिक इतिहास लिहिले जाऊ लागले. मीनाक्षी सुंदर लिखित 'तमिळ साहित्य इतिहास', सीतापतीकृत 'तेलुगू साहित्य इतिहास', मुगळी लिखित 'कन्नड साहित्य इतिहास', परमेश्वरन नायरकृत 'मल्ल्याळम् साहित्य इतिहास', बाबूराम सक्सेनांचा 'उर्दू साहित्य इतिहास', तसेच मोहनसिंह लिखित 'पंजाबी साहित्य इतिहास' उल्लेखनीय होत. आज साहित्य अकादमीने सर्व भाषांच्या स्वतंत्र इतिहासाशिवाय समग्र भारतीय भाषा व साहित्याचा इतिहास आणि कोशही प्रसिद्ध केला आहे.आज भारतीय साहित्य अनेक भाषांमधून लिहिले जात असले तरी तिचे स्वरूप मात्र एकात्म आहे, कारण त्या साहित्याचा पाया भारतीय संस्कृती आहे.

जागतिक पातळीवर जर्मन कवी गटेने विश्वसाहित्याची संकल्पना व्यक्त केली होती. भारताच्या संदर्भात रवींद्रनाथ टागोर यांनी 'विश्वभारती', तर महाराष्ट्रात साने गुरुजींनी 'आंतरभारती' संकल्पना 'साधना' साप्ताहिकातून स्पष्ट केली होती. भारतीय साहित्यात प्राचीन काळापासून मिथक, चिंतन, मूल्य अशा त्रिविध अंगांनी समान परंतु समांतर अभिव्यक्ती होत आली आहे. त्यातूनच राष्ट्रीयतेचा विचार पुढे आला आहे. भारताचे प्राचीन साहित्य जैन, बौद्ध, नाथ, सिद्ध, वैष्णव इ. धर्म नि संप्रदायांमुळे निर्माण झाले. यातून सर्व भारतीय प्रांतांत आणि भाषांमध्ये समान काळात समान प्रवृत्तीचे परंतु त्या-त्या भाषा, प्रांतांचे साहित्य निर्माण झाले. प्रथम दरबारी कवींनी राजांच्या शौर्यकथा लिहिल्या. हे काव्यचारण, भाट, आश्रित दरबारी कवींचे असल्याने त्यात अतिशयोक्ती होती; पण वीर, शृंगाररसांची महाकाव्ये, चरित्रकाव्ये अनेक भाषांमधील आदिकालातील काव्ये म्हणून सर्वश्रुत आहेत. त्यात कालभान आहे, तसेच तत्कालीन स्थितीचे (युद्ध, तह, आक्रमण, दरबारी परंपरा इ.) ते वास्तव चित्र म्हणून ऐतिहासिक ठरते. नंतरच्या समाजजीवनात राजांची जागा देवांनी घेतली. समाज दैववादी बनण्याला विदेशी आक्रमकांची आक्रमणे, अन्याय-अत्याचार कारणीभूत होते, तसेच स्वदेशी धर्ममार्तंडांचे अन्याय, कर्मकांडांचा अतिरेक, स्पृशास्पृश्य व्यवहारही कारणीभूत होता. त्या प्रतिक्रियेतून भक्ती आंदोलन उदयाला आले. त्यातून समतेचा विचार सुरू झाला. सर्वधर्म समानतेची, समभाव व सहिष्णुतेची वृत्ती विकसित झाली. मूर्तिमय भक्तीची जागा भावभक्तीने घेतली. सदाचार, नामस्मरण, पुण्यकर्म, भूतदया, माणुसकीची मूल्ये संत काव्यांनी भारतीय समाजात रुजविण्याचे मोठे कार्य केले. कबीर, जायसी, तुलसीदास, सूरदास, नरसिंह मेहता, नामदेव, नानक, कुमार आशान आदींपासून ते प्रादेशिक संतांपर्यंत सर्वांनी भक्ती आंदोलनाला लोकचळवळीचे रूप दिले. वारी, जत्रा, अनुष्ठान, पारायणे यांतून ही चळवळ उदयाला आली. तिच्यामुळे पुरोहितशाहीला शह मिळाला.

नंतरचा काळ पंडित कवींचा म्हणून उदयाला आला. संस्कृत रीती ग्रंथांचे प्रादेशिक अनुवाद झाले. त्यातून काव्य, छंद, रस, अलंकारांचा सार्वत्रिक प्रचारप्रसार झाला. या काव्याने सौंदर्य, शृंगाराचे जीवनातील महत्त्व अधोरेखित करताना काव्य, नाटक, नृत्य यांना समाज व धर्म या दोन्ही स्तरांवर प्रतिष्ठा मिळवून दिली. नाट्यशास्त्र, काव्यशास्त्र, साहित्यशास्त्र, नृत्यशास्त्र, शिल्पकला, चित्रकला, गायन, संगीत आदींना बहर आला. मध्यकाल जसजसा ओसरत गेला, तसे समाजजीवन आणि संस्कृती या दोन्हींकडे राजा, परमेश्वर, दैव, धर्म यांची जागा मानवमूल्ये, माणूसजीवन, जीवनसंघर्ष यांनी घेतली. म्हणून मग नंतरचे साहित्य आधुनिक मानले गेले. साहित्यात गद्याच्या विकासाने विस्तारास वाव मिळाला. इंग्रजांचे आगमन, पाश्चात्त्य साहित्यसंपर्क,

समाजसुधारणा, यंत्र-आगमन, दळणवळण साधनांचे जाळे (पोस्ट, तार, टेलिफोन, रेल्वे, मोटार, कारखाने इ.) यांतून नागरी जीवन उदयाला आले. त्यामुळे कुटुंबव्यवस्था, विवाहपद्धती, जातिभेदाला विरोध, पुरोगामी धारणांचा प्रचार करणारे साहित्य सर्व भाषांमध्ये आले. त्याचे एक कारण इंग्रजी साहित्याची मोठ्या प्रमाणात झालेली भाषांतरे होत. समाजसुधारणांइतकेच परिवर्तनाचे कार्य भाषांतरित साहित्याने केले. सरंजामी, जमीनदारी, पुरोहितशाही विरुद्ध सर्वसामान्य केंद्री व सर्वसामान्यांचे प्रबोधन करणारे साहित्य निर्माण झाल्याने परंपरेच्या जोखडातून भारत मुक्त झाला. यातूनच देशस्वातंत्र्याचे स्वप्न उदयाला आले. अन्याय, अत्याचार, अस्पृश्यता, अंधश्रद्धांची जाणीव या साहित्याने करून दिली आणि सारा भारत देश परंपरेच्या दीर्घ निद्रेतून जागा झाला. या जागृतीने त्याला संघर्ष, सत्याग्रह, समानता, स्वाभिमान, स्वावलंबन, स्वातंत्र्य ही जीवनमूल्ये व मार्ग दाखवले. त्यातून भारतीय समाज प्रबुद्ध झाला. हे चित्र नि चित्रण कमी-अधिक प्रमाणात तत्कालीन सर्वभाषी साहित्यात दिसून येते. या समान परंतु समांतर एकात्मतेतूनच भारतात वेळोवेळी विविधतेतून एकता निर्माण होत गेली. त्यातून राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारास बळकटी मिळाली.

आज जागतिकीकरणानंतर आणि माहिती तंत्रज्ञान साधनांच्या विकासयुगात जग जवळ आले; तसाच भारत विविध प्रांत, भाषा, साहित्य, संवाद, संपर्क आदींच्या माध्यमांमधून जवळ आला. शिवाय तो पूर्वीच्या तुलनेने अधिक एकात्म झाला .आज संगणकीय संसाधनांमुळे अनुवाद, संपादन, लिप्यंतरण (अक्षरांतरण) एका टिचकीत नि कटाक्षात शक्य झाल्याने भाषिक आणि लिपीचा अडसर दूर झाला आहे. परभाषेतील मजकूर मध्यस्थाशिवाय मिळणे सोपे व सहज झाले आहे. पूर्वी जे काम साहित्य अकादमीसारखी संस्था करायची, तेच काम महाजालीय व्यवस्थेच्या आभासी दुनियेवर उपलब्ध तरल संसाधने माणसांच्या किती तरी गरजा लीलया सोडविताना दिसतात. काळ-काम-वेगाचे गणित इतिहासजमा करायच्या अगतिक, आभासी काळात भाषा-साहित्य वैश्विक होणे, आंतरभारतीय होणे अनायासे शक्य झाले आहे.

भारतीय भाषा, लिपी व साहित्यापुढील आजचे प्रश्न एकात्मतेच्या संदर्भात साधनांचे न राहता ते मानसिक, भावनिक व अस्मितेचे राहिले आहेत. प्रांतापेक्षा राष्ट्र मोठे, हा विचार देशबांधवांत रुजवणे आता महत्त्वाचे आहे. शिवाय भारतीय असण्याची काही समान मूल्ये, प्रवृत्ती, संस्कृती निर्माण करण्याची गरज आहे. एक भाषा, एक लिपी असलेली राष्ट्रे उपजत एकच असतात. तशीच भिन्न भाषीयदेखील; भारतातील आर्य आणि द्रविड कुळातील भाषांना भिन्न न मानता त्यातील समान दुवे, चरित्र, विचार, मिथक सार्वत्रिक करण्यातून भारतीय साहित्याची सार्वत्रिक व समान ओळख निर्माण होऊ शकेल. ते आव्हान नव्या पिढीने प्रगल्भपणे पेलायला हवे. अस्मिता व अस्तित्वाच्या अभिनिवेशी क्रिया-प्रतिक्रियांपेक्षा राष्ट्रीय आचारधर्माचा विचारपूर्वक संयत परंतु प्रगल्भ विचार, व्यवस्थाच या देशाला एकात्म बनवू शकते. वर्तमान राजकारणापासून त्याची फारकत करायची असेल, तर त्याचे साधन केवळ साहित्यच होऊ शकते. बर्लिनची भिंत पाडून जर्मन पुन्हा एकात्म झाला, तो एका चित्रकाराच्या चित्रांमुळे; असे जे सांगितले जाते, ते कला व साहित्य यांचे सामर्थ्य सूचित करणारे आहे. तीच गोष्ट भारतीय एकात्मतेचीसुद्धा आहे.

जेव्हा आपण 'भारतीयता' भावनेपलीकडे जाऊन व्यवहाराच्या पातळीवर प्रतिबद्धपणे स्वीकारू, तेव्हाच 'आंतरभारती'चे स्वप्न प्रत्ययास येईल- प्रत्यक्षात उतरेल. त्यासाठी प्रांतवादी संकीर्णतेतून आपण मुक्त होऊन राष्ट्रीय भावनेच्या पातळीवर सर्व प्रश्न व समस्यांचा विचार करायला शिकले पाहिजे. आपली सांस्कृतिक ओळख एक व्हायला हवी. समान जीवनमूल्ये आणि जीवनशैली आपण अंगीकारायला हवी. जात, धर्म, ईश्वर या व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या गोष्टी असून; स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद, विज्ञाननिष्ठांसारख्या सांविधानिक तत्त्वांवरच आपला सार्वजनिक व सार्वत्रिक व्यवहार बेतलेला हवा.

श्रद्धा आणि अंधश्रद्धांमधील दरी अरुंद करून विवेकवादी समाज सद्भाव आपण रुजवू शकतो का, ते पाहायला हवे. नवसाहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून नवा भारत घडवण्याचे शिवधनुष्य उचलायला हवे. वर्तमान समाजाचे गहन प्रश्न व समस्या लक्षात घेता अंधश्रद्धानिर्मूलन, विवेकवाद, लिंग समभाव, स्त्री-पुरुष समानता, राजकारणाच्या जागी समाजकारण, जात-धर्मनिरपेक्षता, व्यक्तिगत स्वातंत्र्य, नैतिकता, भ्रष्टाचारमुक्त परिपाठ, राष्ट्रीय हित प्रथम अशी मांडणी साहित्य, शिक्षण, संस्कार, प्रबोधन इत्यादी माध्यमांतून करण्याचे सजग सायासच या देशाचे चित्र बदलून नवभारत घडवतील, यावर माझा विश्वास आहे. भाषा, साहित्य, कला, दृक्-श्राव्य माध्यमे देशघडणीची साधने झाली, तरच हे शक्य आहे. भारतीय भाषा, साहित्याची नव्या शतकातील ओळख यासंदर्भात महत्त्वाची आहे. नवा वाचक प्रगल्भ करण्याची आणि त्यातून जबाबदार, कर्तव्यपरायण, कार्यसंस्कृत नागरिक घडवणे हे नव्या भारतीय साहित्याचे ध्येय असायला हवे.

स्वातंत्र्यापूर्वी जुलमी पद्धतीने शासन करणा-या ब्रिटिशांविरुद्ध आवाज उठवण्यासाठी देशभक्तांनी लेखणीचा वापर केला. त्यावेळी आपल्या लेखणीतून अनेक क्रांतिवीर जन्माला आले आणि ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्तता मिळवण्यासाठी लेखणीतून आणि नेत्यांच्या भाषणांतून प्रवृत्त होऊन जनता ब्रिटिशांविरुद्ध लढा देत होती. त्यावेळी लोकांपर्यंत संदेश पोहोचवण्यासाठी वृत्तपत्र आणि नेत्यांची भाषणे हीच माध्यमे होती. अर्थात, स्वातंत्र्यापूर्वी वृत्तपत्रे आणि भाषणे केवळ ही दोनच सशक्त प्रसारमाध्यमे होती. मात्र देशाच्या स्वातंत्र्यानंतर महात्मा गांधी यांनी आकाशवाणी केंद्राला १२ नोव्हेंबर १९४७ला पहिल्यांदा भेट दिली आणि तेथूनच त्यांनी शांतता राखण्याचे आवाहन केले होते. त्या दिवसापासून १२ नोव्हेंबर हा दिवस सार्वजनिक प्रसारण सेवा दिवस म्हणून साजरा केला जातो.

आकाशवाणी हे भारताचे सर्वात मोठे प्रसारणाचे माध्यम आहे.स्वातंत्र्यानंतर आकाशवाणीला हळूहळू महत्त्व प्राप्त होऊ लागले. त्यानंतर दूरदर्शन अस्तित्वात आले. देशभरातील लोकांना दूरदर्शनचे आकर्षण वाटू लागले. आजूबाजूच्या घडामोडींचे प्रत्यक्ष हलते चित्र दूरदर्शनवर दाखवण्यात येऊ लागले. त्यामुळे त्या काळात दूरदर्शन हे प्रसारमाध्यमाचे जास्तीत जास्त प्रभावी माध्यम ठरले. घडलेली घटना काही काळानंतर दूरदर्शनवर प्रसारित करून लोकांना दाखवण्यात येत होती. मात्र १९९०च्या जागतिकीकरणानंतर माध्यम क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल घडून आले. तंत्रज्ञान, दळणवळणाची सोय यामुळे बातम्यांचे प्रसारण जलद गतीने होऊ लागले. देशभरात काय घडते आहे, याची उत्सुकता लोकांना अधिक जाणवू लागल्यामुळे दूरदर्शन बघण्यासाठी लोक तासन् तास टीव्हीसमोर बसून असल्याचे त्या वेळी पाहावयास मिळत होते.

सध्या माहितीचे आणि संदेशाचे वहन इतके जलदगतीने होत आहे की १ सेकंदापूर्वी, २ मिनिटांपूर्वी काय घडले याच्या अपडेट्स ट्विटर किंवा फेसबुक किंवा व्हॉट्सअॅप यांसारख्या सोशल साईट्सवरून त्वरित प्रसारित होत असतात. एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी संदेशवहनाचे प्रमाण सध्या झटपट होताना दिसत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू असलेल्या संदेशवहनाच्या प्रसारणाची जागा जरी आजच्या फेसबुक व्हॉट्सअॅपने घेतली असली तरी देखील आजही पुरातन माध्यमांनी त्याच जोशात तग धरला आहे. माध्यमांचा वापर दिवसेंदिवस वाढत असून वृत्तपत्र आणि माध्यमांची जागा फेसबुक आणि व्हॉट्सअॅपने घेतली आहे. परंतु यामुळे मूळ पत्रकारिता आणि पत्रकारांच्या प्रतिमेला धोका आहे. कारण आजकाल माध्यमं इतकी डोईजड झाली आहेत की, कोणीही पत्रकार होऊ शकतो. फेसबुक, व्हॉट्सअॅपमुळे बातमीची मूल्यं ढळली आहेत. कारण काही वेळेस चुकीची माहिती प्रसारित होऊन जनजीवन अडथळ्यात येते, त्यामुळे माध्यम कधी कधी घातक आहेत की काय असा सवाल पडल्याशिवाय राहत नाही. प्रसारमाध्यम आज बाजारीकरणामुळे चुकीच्या बातम्या सादर करून वृत्तपत्राची विश्वासार्हता डळमळवू पाहत आहे.

एकविसाव्या शतकात साहित्य व्यवहार थांबले आहेत की झपाट्याने होत आहेत हे तपासून पाहता असे जाणवते की, साहित्य व्यवहार प्रत्यक्ष पुस्तकाच्या रूपाने तर होत आहेत पण शिवाय नवीन प्रसार माध्यमातूनही गतीने होत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगातील नवी प्रभावशाली ,गतिमान असलेली डिजिटल मीडिया या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रसार माध्यमांचा वेगाने उपयोग होऊ लागला आहे . नवीन तरुण पिढी या मीडियाचा सर्वात वापर करताना दिसते. क्षणार्धात विविध लेखन साहित्य घेऊन जाणाऱ्या या माध्यमांचा वेग पाहता नवल वाटल्या वाचून राहत नाही. माहितीचे महाजाल म्हणजे इंटरनेट सुविधा आणि साहित्याची निगडित असलेल्या वेगवेगळया वेबसाईट यावरून दररोज नित्य नियमाने साहित्य प्रकाशित होत आहे. मराठी भाषेचा वैभव संपन्न इतिहास आणि तिची समृद्धी पाहिली की,फादर स्टीफन यांनी मराठी भाषेबद्दल काढलेल्या जैसे पुष्पा माझी पुष्प मोगरी ,परिमळ माझी कस्तुरी , तैसा भाषा माझी साजरीमराठीया" या उद्गाराची आठवण होते. प्रसार माध्यमे हे समाजाचा आरसा आहे समाजात घडलेली प्रत्येक घडामोडी टिपून ती घराघरात पोहोचविण्याचे काम प्रसारमाध्यमे करीत असतात- आज वेगवेगळी माध्यमे नकळतपणे आपल्या जीवनप्रवाहाला जोडली गेली आहेत सकाळी उठल्याबरोबर आपल्यासमोर वृत्तपत्र येते याशिवाय व्यवसाय ज्ञान मनोरंजन संवाद या अनुषंगाने कंप्यूटर व इंटरनेटच्या माध्यमातून प्रत्येक माणूस आज जगाला जोडला गेला आहे. आकाशवाणी दूरदर्शन वृत्तपत्रे इंटरनेट फोन चित्रपट नाटक आणि लेखन ग्रंथ ही सारी प्रसार माध्यमे आपल्या रोजच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करतात. आपल्या विचाराला आणि कृतीला ती जोडली जातात.

चैताली मनोज कोष्टी
एम ए . बी एड ( मराठी इतिहास)
स्कूल ऑफ स्कॉलर्स,
यवतमाळ -445001

**<u>संदर्भ ग्रंथे</u>**

1. प्रसार माध्यमे आणि मराठी भाषा- डॉक्टर भास्कर शेळके व डॉक्टर मिलिंद कसंबे
2. भारतीय भाषा व साहित्य डॉक्टर सुनील कुमार लवटे
3. भारतीय साहित्य विचार प्राध्यापक डॉक्टर तुषार चांदवडकर
4. भारतीय साहित्य- एम के मोरया
5. भारतीय साहित्यकार स्वरूप- आनंद सर
6. भारतीय कथा साहित्य
7. यूट्यूब व्हिडिओ